# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

अपील क्रमांक : १३७७/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर, विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर-३३ | ग्रामसेवक, ग्राम पंचायत, आलागोंदी, ता.जि. नागपूर | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १४.११.२०२४**

१. **उपस्थिती** –

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. **व्दितीय अपील अर्ज** –

(१) **व्दितीय अपील अर्जाचा दिनांक** : २३.०५.२०२२

(२) **व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** : २३.०५.२०२२

(३) **व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे** : मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१२.२०२१ प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब सादरकेले होते. त्या नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०२.२०२१ रोजी प्रथम अपिलाचे सुनावणी घेउन सदर अपीलान्वये दि. ०७.०३.२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी यांना माहिती देणेबाबत कालावधी निरंक आदेशित केलेले होते. तरीसुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ कायद्यानुसार विहित मुदतीत व आजपर्यंत आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अद्यापर्यत कुठलिही माहिती मला दिलेली नाही. त्यमुळे जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारीच्या आदेशयाची अवहेलना केलेली असून कायदेशिर दोषी आहे.

(४)**व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती** : जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ कायद्याच्या तरतुदीनुसार अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती दिलेली नसून, त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम मधील कलम २० (१), १९(८) (ग) नुसार, त्यांच्यार जास्तीत जास्त शास्ती लादण्यात यावी आणि कलम २० (२) नुसार कायदेशीर कारवाई करावी व इतर दोन मुद्यात विनंती केली आहे.

**माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०.११.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : वर्ष २०१९ ते आजपर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : ग्रामपंचायत निहाय सुरु असलेले सर्व बांधकामेबाबत (शासनाचे सर्व योजनेनुसार) तपशिल क्रमनिहाय यादीची प्रत पूर्ण झालेले सर्व बांधकामच्या तपशिल,प्रलंबित सर्व बांधकाम माहिती सर्व बांधकामाबाबत शासनाकडून प्राप्त निधीचा तपशिलाची माहिती मागितली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी यांना माहिती अर्ज प्राप्त झाला नसल्याने माहिती प्रदान करण्यात आली नाही.

३. **प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१.०३.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.०३.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत व आजपर्यंत माहिती दिली नसून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) चा भंग केले असून कायदेशीर दोषी आहे. कारण जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत परिपूर्ण माहिती आजपर्यंत दिलेली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती किंवा माहितीचा भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल तर तो अर्ज माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसांत त्या संबधीत प्राधिरणाकडे हस्तांतरीत करावा व अर्जदारास तत्सबंधी सूचना देणे अपेक्षीत होते, असे दि. २५.०३.२०२२ रोजी निर्णय दिला.

४. **युक्तीवाद/लेखी खुलासा** —आज सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची सार्वजनिक विधानसभा निवडणूक कामकाजासाठी नियुक्ती झाली असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले असून पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गट ग्रामपंचायत आलागोंदी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संदर्भीय निर्णयानुसार अपिलार्थी यांना दि. ०६.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली असून त्यांना दि. २५.०५.२०२२ रोजी माहिती प्रत्यक्ष प्राप्त झाली असल्याची पोहच सादर केली आहे.

५. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

आयोगास सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार, अपिलार्थी यांना दि. २५.०५.२०२२ रोजी माहिती प्रदान करण्यात आली आहे, सबब व्दितीय अपिल अर्ज निकाली काढणे संयुक्तिक ठरते.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४.११.२०२४

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★
सत्यमेव जयते

जावक क्रमांक 248 दिनांक 13 JAN 2025